पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

**सभावृत्तांत**

दिनांक : **०७/०२/२०१४** वेळ : दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०७/०२/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. प्रशांत शितोळे
३) मा. शितोळे शैलजा बाबुराव
४) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
५) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.गावडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.थोरात, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.चिंचवडे,मा.जुंधारे, मा.घोडे – कार्यकारी अभियता, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ३) च-होली प्रभाग क्र.७ मधील नविन रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणेचे काम नाशिक फाटा उड्डाण पुलाखाली सर्व्हिस रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणे या रद्द कामातून करणेबाबत.

विषय क्रमांक ४) थेरगाव गावठाण ते पद्मजी पेपर मिल २४ मी. डी.पी.रस्त्याचे उर्वरित काम करणे.

विषय क्रमांक ५) प्रभाग क्र.११ यमुनानगरमधील प्रबोधनकार ठाकरे ग्राऊंडवरील प्रोपलेक्स स्टेडियम मध्ये अकौस्टीक सिस्टिम करणे.

विषय क्रमांक ६) काळाखडक ते वाकड फ्लायओव्हर पर्यंतचा २४ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणे या कामामधून वाकड गावठाणातील म्हातोबा मंदिरामागे रिटेनिंग वॉल बांधणेबाबत - मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७) श्री.अनिल एम. मेंगशेट्टी, कनिष्ठ अभियंता यांना मानिव दिनांक मिळणेबाबत - मा.भाऊसाहेब भोईर, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ८) वीर सावरकर उद्यानात बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी पुरेसा एफ.एस.आय. उपलब्ध नसल्याने सदरचा हॉल धिंग्रा मैदानात उभारणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ९) सारथी योजनेवर प्राप्त होणा-या तक्रारी सुचनांची माहिती संबंधित वॉर्डचे नगरसदस्यांना मिळणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १०) उद्यानासाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

दिनांक ०७/०२/२०१४ दुपारी १२.०० वा. ची सभा सोमवार दिनांक १०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.१५ पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** दिनांक ०७/०२/२०१४ दुपारी १२.०० वा. ची सभा सोमवार दिनांक १०/०२/२०१४ रोजी दुपारी ३.१५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

**सभावृत्तांत**

( दिनांक ०७/०२/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक : **१०/०२/२०१४** वेळ : दुपारी **३.१५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक ०७/०२/२०१४ ची तहकूब सभा सोमवार दिनांक **१०/०२/२०१४** रोजी दुपारी **३.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहूल – **सभापती**
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. शितोळे शैलजा बाबुराव
६) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.कुलकर्णी – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक : २०८ विषय क्रमांक : १
दिनांक : १०/०२/२०१४ विभाग : भुगयो विभाग
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/भुगयो/१०३/२०१३, दि.३१/१२/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे भुगयो विभागाचे भाटनगर मै.शु.केंद्र येथे नव्याने होणा-या पंपहाऊसमध्ये पंपींग मशिनरी बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामीचे प्रस्तुत एकूण र.रु.८२,३५,०००/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी लाख पस्तीस हजार फक्त) चे पुर्वगणन पत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २०९ | विषय क्रमांक : २
दिनांक : १०/०२/२०१४ | विभाग : आकाशचिन्ह परवाना
सुचक : मा.निलेश बारणे | अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/७/कावि/३१/२०१४, दि.१५/०१/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औद्योगिक क्षेत्रात असलेली मंदी विचारात घेता तसेच सन २०१३-१४ चे उद्योगधंदा,

व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-१४ चे दर कायम ठेवण्यात यावेत असे सुचविणेत आले आहे. त्यानुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता प्रस्तावासोबतचे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब, व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सादर केलेले असल्याने त्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : २१० | विषय क्रमांक : ३
दिनांक : १०/०२/२०१४ | विभाग : विद्युत विभाग
सुचक : मा.प्रशांत शितोळे | अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.वि/मुका/५/कावि/७०/२०१४, दि.०३/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात च-होली प्रभाग क्र.७ मधील नियोजित रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणेकामाकरीता अंदाजपत्रक पानांक ५१२/१२३ तरतूद वर्गीकरण आदेश क्र.कप्र/वि/९५४ २०१३, दि.१६/११/२०१३ नुसार र.रु.३५,०९,०००/- इतकी तरतूद करणेत आली आहे. तरी सदरचे काम हे नाशिक फाटा उड्डाण पुलाखाली सर्व्हिस रस्त्यावर प्रकाश व्यवस्था करणे ह्या निविदा क्रमांक ६/२ १३-१४ चे रद्द निविदा कामातून प्राप्त निविदा दर (१८.९८९**%** कमी) दराने लघुत्तम निविदाधारक एजन्सी मे.ओम एकदंताय इलेक्ट्रीकल यांचेकडून कामाचे ठिकाणात बदल करुन करणेस( **Change of site** ) व र.रु.४०,००,०००/- इतक्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २११ | विषय क्रमांक : ४
दिनांक : १०/०२/२०१४ | विभाग : ड मुख्यालय
सुचक : मा.वैशाली काळभोर | अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/डमु/१/३६८/२०१४, दि.०३/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे ड स्थापत्य मुख्यालयाचे थेरगांव गावठाण ते पदमजी पेपर मिल २४ मी. डी.पी.रस्त्याचे उर्वरित कामे करणेकामी येणा-या र.रु.१,८७,५०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी

सत्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१२ विषय क्रमांक : ५

दिनांक : १०/०२/२०१४ विभाग : फ प्रभाग स्थापत्य

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.फ/क्षे/स्था/२/२०१४, दि.०४/०२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्रमांक ११ यमुनानगरमधील प्रबोधनकार ठाकरे ग्राऊंडवरील प्रोपलेक्स स्टेडियम मध्ये अकौस्टीक सिस्टिम करणेकामीचे र.रु.२८,०२,६६२/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख दोन हजार सहाशे बासष्ट फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१३ विषय क्रमांक : ६

दिनांक : १०/०२/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे

संदर्भ : मा.शैलजा शितोळे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.५३ वाकड येथे स्थापत्य विभागामार्फत काळाखडक ते वाकड फ्लायओव्हर पर्यंतचा २४.०० मी.डी.पी. रस्ता विकसीत करणेचे काम चालू आहे. भूमी संपादनाअभावी सदर कामाच्या निविदेच्या शिलकीतून याच प्रभागातील वाकड गावठाण येथील ऐतिहासीक म्हातोबा मंदीरामागे रिटेनिंग वॉल बांधणेचे कामकरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१४ विषय क्रमांक : ७

दिनांक : १०/०२/२०१४

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.भाऊसाहेब भोईर, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

श्री.अनिल एम.मेंगशेट्टी हे महाराष्ट्र शासनाच्या भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये दि.४ डिसेंबर १९९५ रोजी रुजू झाले. भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये त्यांनी ४ डिसें. १९९५ ते ३० एप्रिल १९९८ या दरम्यान काम केले असून त्यांना उत्कृष्ठ अभियंता म्हणून विशेष गुणवत्ता प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने गौरविले आहे. प्रकल्प संपल्यानंतर दि.१८ एप्रिल २००२ मध्ये शासनाकडून पिं.चिं.मनपामध्ये कनिष्ठ अभियंता पदावर रुजू झाले. सन १९९५ ते २००२ म्हणजे एकूण ७ वर्षे सेवा जेष्टता कालावधीचे त्यांचे नुकसान झाले आहे. तसेच ७ वर्षाचे वेतनवाढीचे (Increment) नुकसान झाल्यामुळे त्यांचे सेवाजेष्टता व आर्थिक असे दोन प्रकारे नुकसान झाले आहे. श्री.अनिल मेंगशेट्टी यांचे पिं.चिं.मनपातील कामकाज चांगल्या प्रकारचे

असल्यामुळे त्यांची सेवा जेष्टता न डावलता त्यांना ४ डिसेंबर १९९५ ची मानिव दिनांक देऊन त्यांना आर्थिक लाभ देणेत यावा. तसेच सेवा निवृत्तीसाठी ४ डिसेंबर १९९५ ही तारीख ग्राह्य धरावी अशी शिफारस महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१५ विषय क्रमांक : ८

दिनांक : १०/०२/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

प्राधिकरण से.२६ वीर सावरकर उद्यानाचे उर्वरित विकासाचे काम करणेची निविदा क्र.२८/६ २०१२-१३ अन्वये काढणेत आली असुन सदरचे काम ठेकेदार मे.यशक कन्स्ट्रक्शन यांना मिळाले असून सदरचे काम चालू आहे. सदर कामात वीर सावरकर उद्यानातील गणेश तलावातील गाळ काढणे, उर्वरित सिमाभिंत बांधणे, बॅडमिंटन हॉल बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेचा अंतर्भाव आहे. सदर उद्यानात बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी पुरेसा एफ.एस.आय. उपलब्ध नसल्याने सदरचा हॉल धिंग्रा मैदानात उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१६ विषय क्रमांक : ९

दिनांक : १०/०२/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.निलेश बारणे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या विविध तक्रारींचे निवारण होण्यासाठी “सारथी” योजना प्रभावीपणे राबविणेत येत आहे. महानगरपालिकेतील सर्व प्रभाग, वॉर्डशी संबंधित तक्रारी येत असतात व सर्व विभागांशी संबंधीत असतात. या योजनेची माहिती तक्रार किंवा सुचना ज्या प्रभागाशी / वॉर्डशी संबंधित आहे त्या नगरसदस्यास विश्वस्त म्हणून मनपा अधिका-यांप्रमाणेच मोबाईलवर माहिती मिळावी. त्यामध्ये Text SMS व Voice SMS सह माहिती व्हावी. जेणेकरुन संबंधित वॉर्ड / प्रभागाचे नगरसदस्य देखील अशा सर्व तक्रारींमध्ये लक्ष घालून तक्रार निवारण करु शकतील. यासाठी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : २१७ विषय क्रमांक : १०

दिनांक : १०/०२/२०१४

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे

संदर्भ : मा.प्रशांत शितोळे, मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव -

आरक्षण क्रमांक ३५५ उद्यान व आरक्षण क्रमांक ३६७ (अ) उद्यान पिंपळे सौदागर या उद्यानांसाठी कन्सलटन्ट (Consultant) म्हणून आर्किटेक्टर आदित्य ढमाले (इन्टेफॉन इन्फ्रास्ट्रक्चर) यांची नेमणूक सदरचे कामासाठी करणे सोयीचे होणार आहे. त्यांची नेमणूक मनपाचे आर्किटेक्ट पॅनेलवर यापूर्वीच झालेली आहे. तरी त्यांचे नेमणूकीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १६४ /२०१४
दिनांक - १३ / ०२ / २०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.